# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ३७-४१

( विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कालावधीत झालेल्या बैठका )

**दिनांक : १२ जुलै ते ३१ जुलै २०१५**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | |
|---|---|---|---|
| ३७ | १२-०७-२०१५ (दुपारी २.३० वा.) | सह्याद्री अतिथीगृह | अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला |
| ३८ | १२-०७-२०१५ (मंत्रिपरिषद-दु. ३.०० वा.) | सह्याद्री अतिथीगृह | |
| ३९ | १६-०७-२०१५ | विधानभवन | विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशन कालावधीत झालेल्या बैठका |
| ४० | २३-०७-२०१५ | विधानभवन | |
| ४१ | ३०-०७-२०१५ | विधानभवन | |

दि. १२ जुलै २०१५
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

**प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविणार**

राज्यामधील बेरोजगार उमेदवारांचे कौशल्य विकसित करून त्यांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागामार्फत -प्रमोद महाजन कौशल्य आणि उद्योजकता विकास अभियान◦ राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. हे अभियान राबविण्यासाठी २०१५-१६ या वर्षासाठी १६१ कोटी ८४ लाख रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

अभियानाच्या सुरळीत आणि प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने विविध योजना आणि उपक्रम राबविण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्तीप्रदत्त समिती स्थापन करण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्य पुरस्कृत योजनांतर्गत उपलब्ध करण्यात येणारा निधी कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाकडे वर्ग करणे बंधनकारक करण्यात येणार आहे. तसेच राज्यातील सर्व शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य विकाससंबंधी योजनांची अंमलबजावणी व संनियंत्रण महाराष्ट्र कौशल्य विकास संस्थेच्या वेबपोर्टलमार्फत करण्यात येणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय त्यांच्या सर्व मंजूर पदे, कार्यरत कर्मचारी वर्ग तसेच अर्थसंकल्पीय तरतूदीसह कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली आणण्यात येणार आहे.

-----०-----

दि. १२ जुलै २०१५
मराठी भाषा विभाग

**मराठीला राजभाषा म्हणून मान्यता**

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ३० एप्रिल १९६६ रोजी मराठी भाषेला शासकीय कामकाजाची भाषा म्हणून घोषित करण्यात आले होते. मात्र मराठीला राजभाषा म्हणून महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये स्पष्ट तरतूद नव्हती. त्यामुळे मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यासाठी या अधिनियमात दुरूस्ती करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या अधिनियमात “महाराष्ट्र राज्याची राजभाषा मराठी असेल” असा स्पष्ट उल्लेख करण्यात येणार आहे. तसेच “मराठी याचा अर्थ वेळोवेळी काढण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये राज्यात जिचा वेळोवेळी अंगिकार केला आहे, अशा देवनागरी लिपितील मराठी भाषा असा आहे”, अशी सुधारणा करण्यात येणार आहे.

-----०-----

दि. १२ जुलै २०१५
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**विद्यापीठाच्या निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतुदीनुसार विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणाच्या निवडणुका तात्पुरत्या स्वरूपात पुढे ढकलण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार या विधेयकाच्या प्रारूपास मान्यता देण्यात आली.

-----o-----

दि. १२ जुलै २०१५
सहकार विभाग

<u>शेतकऱ्यांच्या कर्जाचे व्याजही शासन भरणार</u>

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी केलेल्या पीक कर्ज रुपांतरणासाठी नाबार्डच्या ६० टक्के फेरकर्जास शासनाची हमी देण्याचा निर्णय**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी केलेल्या पीककर्ज रुपांतरणासाठी नाबार्डच्या ६० टक्के रकमेसाठी फेरकर्जास शासनाची हमी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

२०१४-१५ या वर्षात ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी जाहीर केलेली आहे त्या जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना अल्प मुदतीचे कर्ज मध्यम मुदत कर्जात रुपांतरीत केल्यास आकारण्यात येणाऱ्या रकमेपैकी नाबार्डच्या हिश्याच्या ६० टक्के रकमेसाठी ५०० कोटी रुपये राज्य सहकारी बँकेच्या अतिरिक्त एसएलआर प्रतिभूती प्रायमरी सिक्युरिटी म्हणून नाबार्डने तारण घेण्याच्या अटीवर पाच वर्षाच्या कालावधीसाठी शासनाची हमी देण्यात येणार आहे.

अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नाशिक या सात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या रूपांतरणासाठी नाबार्डच्या या हिश्याची ४६७ कोटी ६२ लाख रूपये रकमेस शासनाची हमी मिळणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज रूपांतरणाचा प्रस्ताव येण्याची शक्यता असल्याने ५०० कोटी रूपयांची हमी शासनाकडून देण्यात आली आहे.

सन २०१४-१५ या वर्षात नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्प मुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रूपांतरण करण्यात येईल. या रूपांतरित कर्जाचा प्रत्यक्ष वार्षिक हप्ता बँकेस विहित मुदतीत भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जावरील २०१५-१६ या वर्षाचे संपूर्ण व्याज व त्यापुढील चार वर्षाचे (२०१६-१७ ते २०१९-२०) ६ टक्के दराने होणारे व्याज शासनामार्फत शेतकऱ्यांच्या वतीने संबंधित बँकांना देण्यात येणार आहे.

-----o-----

दि. १२ जुलै २०१५
सहकार विभाग

## एफआरपीनुसार ऊसाला दर देण्यासाठी २ हजार कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज

राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीनुसार ऊसाला दर देण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी २ हजार कोटी रूपये दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम देण्यासाठी मदत व्हावी म्हणून केंद्र शासनाने पात्र १४८ सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना जाहीर केलेली योजना केंद्र शासनाच्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार लागू करण्यात येणार आहे. सरळ व्याजाच्या १० टक्के किंवा बँकेकडून आकारण्यात येणाऱ्या व्याज दरामधील जो दर कमी असेल त्यानुसार केवळ प्रथम वर्षाच्या कर्जावरील सरळव्याज केंद्र शासन अनुदान म्हणून देणार आहे.

पुढील चार वर्षाच्या रिड्युसिंग बँलन्सनुसार १० टक्के सरळ व्याजाचा भार २०१६-१७ साठी १६० कोटी, २०१७-१८ साठी १२० कोटी, २०१८-१९ साठी ८० कोटी, २०१९-२० साठी ४० कोटी असे एकूण ४०० कोटी व्याजाची रक्कम २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून पुढील चार वर्षात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

-----o-----

दि. १६ जुलै २०१५/मदत व पुनर्वसन

## पर्जन्यवाढीसाठी उपाययोजना करण्यास मान्यता

येत्या पावसाळ्यात पर्जन्यवाढीसाठी उपाययोजना (एरिअल क्लाउड सीडींग) करण्यास आज मंत्रिमंडळाने मान्यता दिली. हा प्रयोग २०१५ च्या मान्सून कालावधीत राबविण्यात येणार असून त्यासाठी २८ कोटी इतका खर्चही मान्य करण्यात आला आहे.

मागील काही वर्षांपासून राज्याला दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत काहीच दिवस पाऊस पडून पावसाची सरासरी कायम राहत असली तरी त्याचा उपयोग फारसा होताना दिसून येत नाही. परिणामी शेती आणि उद्योगांना पाण्याची कमतरता जाणवते. पावसाळ्यात योग्य प्रमाणात आणि योग्य वेळी पाऊस होत नसल्यामुळे दुष्काळी परिस्थिती कायम आहे. पावसाचे पाणी उपलब्ध होण्यासाठी १९९३ मध्ये पर्जन्यवाढीसाठी उपाययोजना करण्याचा प्रयोग करण्यात आला होता. पर्जन्यवाढीसाठी उपाययोजना हा एक महत्त्वाचा प्रयोग असून आकाशात आवश्यक ढग असतानाच या प्रयोगाची यशस्वीता चांगली असते. त्यासाठी हे प्रयोग पावसाळ्याच्या काळात करणे गरजेचे आहे. तसेच पावसाळ्यातील काही काळ कोरडा जाण्याची शक्यता असल्यामुळे पर्जन्यवाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. पर्जन्यवाढीच्या प्रयोगांमुळे पावसाच्या प्रमाणात २८ ते ४३ टक्क्यांपर्यंत वाढ होणे अपेक्षित आहे.

या प्रयोगासाठी चालू आर्थिक वर्षाकरिता आपत्ती व्यवस्थापन प्रभागाकरिता करण्यात आलेल्या तरतुदी तसेच विभागाकडे उपलब्ध असलेल्या निधीतून खर्च करण्यात येणार आहे. रॉकेट आणि ग्राऊंड आयोनायझेशन टेकनिकद्वारे पर्जन्यवाढीसाठी पथदर्शी तत्त्वावर प्रयोग करण्यास विनंती करणाऱ्या संस्थांना स्वखर्चाने हा प्रयोग करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----o-----

दि. २३ जुलै २०१५
सामान्य प्रशासन विभाग

**मिहान प्रकल्पासाठी ७३९.७५ कोटींच्या**
**अतिरिक्त खर्चास सुधारित मान्यता**

नागपूर येथील मिहान प्रकल्प विकसित करण्यासाठी उर्वरित ७३९.७५ कोटी रूपयांच्या अतिरिक्त खर्चास सुधारित प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

ग्रामीण भागातील प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबांना सर्व सोयीने विकसित ३०० चौमी, बिगर शेतकरी प्रकल्पग्रस्तांना १५० चौमी आणि शेतकरी व बिगर शेतकरी कुटुंबासोबत राहणाऱ्या स्वतंत्र कुटुंबास प्रत्येकी ५० चौमी प्रमाणे अतिरिक्त क्षेत्र देणे तसेच अतिक्रमणदारास ३५ चौमी क्षेत्र देण्याचे शासनाने निर्धारित केले आहे. यातील अतिक्रमण करून राहणाऱ्या कुटुंबांना १०० चौमी क्षेत्र देण्याची सहमती दर्शविण्यात आली आहे. शहरी भागातील प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या सध्याच्या जागेऐवढे सर्व सोयीने विकसित भूखंड, तसेच ३५ चौ.मी. पेक्षा कमी भूखंड धारकांना किमान ३५ चौ.मी. भूखंड मोफत देण्याचे धोरण आहे. मात्र, शहरी भागातील बिगर शेतकरी प्रकल्पग्रस्त तसेच अतिक्रमण करून राहणाऱ्या कुटुंबांना घर बांधण्यासाठी ३५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडाऐवजी १०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात आला.

खापरी येथे भूसंपादन प्रक्रियेनंतर बांधण्यात आलेल्या ६३ घरांच्या मूल्यांकनाची रक्कम संबंधितांना सानुग्रह अनुदान स्वरूपात देण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच खापरी (रेल्वे) येथील ३.२२ हेक्टर गावठाणाचे भूसंपादन व प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्यासाठी लागणाऱ्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन, भूसंपादन, झुडुपी जंगल जमिनीचे निर्वनीकरण, फास्ट ट्रॅक कोर्टची स्थापना, सानुग्रह अनुदान आदींसाठी १५०८.३६ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी ७६८.६१ कोटी रूपयांच्या खर्चास यापूर्वीच मान्यता मिळाली आहे. त्यामुळे उर्वरित ७३९.७५ कोटी रूपयांच्या सुधारित अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----

दि. २३ जुलै २०१५
वन विभाग

## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वनविकास योजना राबविणार

राज्याच्या व्याघ्र प्रकल्पातील बफर क्षेत्र आणि अभयारण्यालगत गावातील -जन-जल-जंगल-जमीन या संसाधनाचा शाश्वत विकास साधण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यासाठी २०१५-१६ मध्ये राज्य योजनेतून २५ कोटी आणि कॅम्पा योजनेंतर्गत १५ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नैसर्गिक संसाधनाचा शाश्वत विकास साधून उत्पादकता वाढविणे, नागरिकांची वनांवरील निर्भरता कमी करणे, शेतीला पूरक जोडधंदे निर्माण करणे, पर्यायी रोजगार उपलब्ध करून मानव-वन्यप्राणी यातील संघर्ष कमी करणे तसेच नागरिकांच्या सहभागातून वन-वन्यजीवांचे संरक्षण व व्यवस्थापनाचा दर्जा उंचाविण्यात येणार आहे. त्यानुसार २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीत प्रकल्प स्वरूपात ही योजना राबविण्यात येणार आहे.

या योजनेत समाविष्ट करण्यात येणाऱ्या गावातील नैसर्गिक संसाधनांची उत्पादकता वाढविण्यासाठी गावनिहाय सर्वकष सूक्ष्म आराखडा तयार करण्यात येणार आहे. तसेच शासनाच्या विविध विभागांच्या योजनेतील तरतुदींची सांगड घालून एकात्मिक आणि नियोजनबद्धरीत्या गावांचा शाश्वत विकास घडविण्यात येणार आहे. ही योजना स्थानिक नागरिक, विविध शासकीय यंत्रणा आणि तज्ज्ञ नागरिकांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येईल. या योजनेमध्ये राज्यातील सहा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील तसेच एका अभयारण्यालगतच्या १५० गावांची निवड करण्यात आली आहे.

-----o-----

दि. २३ जुलै २०१५
नगरविकास विभाग

## स्मार्ट सिटी अभियान राज्यात राबविणार

केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

-----o-----

दि. २३ जुलै २०१५
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**दोन स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांच्या स्थापनेला मान्यता**

पुणे येथे एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ आणि नाशिक येथे संदिप विद्यापीठ या दोन स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांच्या स्थापनेला मान्यता देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

पुणे येथील महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड एज्युकेशनल रिसर्चतर्फे संचालित एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे आणि संदिप फाऊंडेशन, मुंबईतर्फे माहिरावणी, नाशिक येथे संदिप विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. या दोन्ही स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठांना छाननी समितीने इरादापत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच या दोन्ही विद्यापीठांबाबत निरीक्षण समितीने प्रत्यक्ष पाहणी अहवाल शासनास सादर केला आहे.

एमआयटी विद्यापीठात आर्ट ॲण्ड डिझाईन, जर्नालिजम ॲण्ड मास कम्युनिकेशन, म्युझिक, डान्स, आर्कीटेक्चर आदी २० अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असून त्याची प्रवेश क्षमता २ हजार १९ इतकी आहे. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे १९ अभ्यासक्रमात ५७० प्रवेश देण्यात येणार आहे. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड एज्युकेशनल रिसर्च पुणे या मंडळातर्फे ६५.८३ एकर जमीन उपलब्ध करून दिली असून ५२ हजार ३९ चौरस मीटर बांधकाम करण्यात आले आहे.

-----o-----

दि. ३० जुलै २०१५
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

**अशासकीय अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना**
**सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी**

राज्यातील अशासकीय अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याचा लाभ ३१ संवर्गातील ४७ कर्मचाऱ्यांना होणार असून शासनावर १ कोटी ३ लाख २३ हजार ९६० रूपयांचा भार पडणार आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांमधील काही पदावरील कार्यरत, सेवानिवृत्त आणि मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतन तसेच सहाव्या वेतन आयोगापासून वंचित राहिलेल्या कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

या कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत ७ मे २०१० रोजी निर्देश देण्यात आलेत. मात्र पदाच्या आढाव्यानुसार अतिरिक्त ठरलेल्या व कार्यरत असलेल्या कर्मचारी संवर्गाचा समावेश नव्हता. त्यामुळे ४३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे शक्य झाले नाही. पाचवा वेतन आयोग आणि पदाच्या आढाव्यातील शासन निर्णयात विविध पदावर कार्यरत असलेली पदे अतिरिक्त नाहीत, तरीही या संवर्गाबाबत सहाव्या वेतन आयोगामध्ये कोणतेही निर्देश देण्यात आलेले नसल्याने सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली नव्हती. त्यानंतर १४ जानेवारी २००३ च्या शासन निर्णयानुसार समावेशन करण्यात आले आहे.

-----o-----

दि. ३० जुलै २०१५
ऊर्जा विभाग

## कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीला दरवर्षी पाच कोटी रूपये देण्याचा निर्णय

कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीला महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीकडून २०१०-११ पासून दरवर्षी पाच कोटी रूपये देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या भाडेपट्टीपोटी २०१५-१६ पासून दरवर्षी देय असलेल्या रकमेतून कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीस २०१०-११ ते २०१४-१५ पर्यंत प्रतिवर्षी पाच कोटी रूपये आणि २०१५-१६ ते २०१९-२० पर्यंत दरवर्षी पाच कोटी रूपये याप्रमाणे दरवर्षी एकूण दहा कोटी रूपये रक्कम वीज निर्मिती कंपनीकडून परस्पर देण्यात येणार आहे. राज्य किंवा केंद्राच्या योजनांमध्ये ज्या कामांचा समावेश होऊ शकत नाही, केवळ त्याच कामांसाठी हा निधी उपयोगात आणला जाणार आहे.

कोयना परिसरात ११ डिसेंबर १९६७ रोजी झालेल्या भूकंपामुळे प्रभावित झालेल्या नागरिकांचे पुनर्वसन करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती स्थापन करण्यात आली. समितीस सादर केलेली कामे राज्य शासनाच्या विहित योजनांमधून करण्यात येतात. मात्र, या विहित योजनांमध्ये निधीअभावी काही कामे समाविष्ट होऊ शकत नाहीत. अशा कामांची निकड आणि समितीकडील निधी विचारात घेऊन त्यांना समितीमार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येणार आहे.

-----०-----

दि. ३० जुलै २०१५
वित्त विभाग

## एलबीटीऐवजी पर्यायी महसूल व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय

स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करून पर्यायी महसूलाची व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सन २०१४-१५ या वर्षासाठी ५० कोटी रूपयांवरील उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांव्यतिरिक्त अन्य व्यापाऱ्यांवरील एलबीटी १ ऑगस्ट २०१५ पासून रद्द करण्यात येणार आहे. यासाठी नगरविकास विभाग मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमांतर्गत अधिसूचना काढणार आहे. एलबीटी रद्द केल्यानंतर होणाऱ्या नुकसान भरपाईसंदर्भात पर्यायाची निश्चिती होईपर्यंत संक्रमण कालावधीसाठी स्थानिक संस्थांना त्यांच्या २०१५-१६ च्या संभाव्य महसुलाच्या प्रमाणात प्रत्येक महिन्याला अनुदान देण्यात येणार आहे. संभाव्य महसुलाची परिगणना करण्यासाठी मागील ५ वर्षांचा सर्वोच्च महसूल आधारभूत धरण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे स्थानिक संस्थांना त्यांच्या क्षेत्रात जमा होणारा मुद्रांक शुल्क राज्याच्या एकत्रित निधीत जमा न करता संबंधित स्थानिक संस्थांना वर्ग करण्यात येणार आहे.

-----०-----

दि. ३० जुलै २०१५
सामान्य प्रशासन विभाग

**राज्यपालांचे परिवार प्रबंधक कार्यालयातील**
**माळी पदाच्या वेतन संरचनेत बदल**

राज्यपालांचे परिवार प्रबंधक यांच्या कार्यालयातील माळी या पदाच्या वेतन संरचनेत बदल करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

माळी संवर्गातील पदाची वेतन संरचना ४४४०-७४४०, ग्रेड पे १३०० अशी आहे. मात्र २०१० मध्ये सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्यात आली आहे. त्यामुळे वेतन संरचनेत सुधारणा करणे गरजेचे होते. तसेच कृषि आयुक्तालय, फलोत्पादन संचालनालय आणि शिक्षण संचालनालय, शालेय शिक्षण आणि जलसंपदा विभागाच्या अखत्यारीतील माळी संवर्गास ५२००-२०२००, ग्रेड पे १८०० ही वेतन संरचना आहे. कृषि आयुक्तालय आणि राजभवनातील माळी पदास सारख्याच कर्तव्य आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे त्यांच्या वेतनश्रेणीत वाढ करणे गरजेचे होते.

सुधारित अर्हता धारण करणाऱ्या माळी पदावरील कर्मचाऱ्यांची वेतन संरचना ४४४०-७४४०, ग्रेड पे १३०० ऐवजी ५२००-२०२००, ग्रेड पे १८००, तसेच माळी मुकादम या संवर्गाची वेतन संरचना ५२००-२०२००, ग्रेड पे १८०० ऐवजी ५२००-२०२००, ग्रेड पे १९०० करण्यात येणार आहे. या सुधारणेमुळे पडणाऱ्या अतिरिक्त ७५ हजार ६०० रूपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली.

-----०-----